

# सौर कृषी पंपाकरीता अर्ज करण्यासाठी माहितीपुस्तिका

केंद्र शासनाने वापरात असलेले डिझेल पंप बदलने आणि पारंपरिक वीज न पोहोचलेल्या ठिकाणांसाठी पारेषण विरहित सौर पंपांसाठी शेतक-यांना अनुदान देणेसाठी कुसुम योजना जाहिर केली.


दिलेल या लिंक वर क्लिक केल्यानंतर कुसुम योजनेच्या नोंदणी करीता खालील प्रकारे स्क्रिन दिसेल.अर्जदाराचे वैयक्तिक आणि जमिनीचे तपशीलची सर्व माहिती भरून “अर्ज दाखल करा ” या बटणावर क्लिक करा.




योजनेकरीता नोंदणी केल्यानंतर “अर्ज दाखल करा ” या बटणावर क्लिक केल्यानंतर अशा प्रकारे संदेश दिसेल. आपण दिलेली माहिती बरोबर असल्याची खात्री करुन “होय, पुढे चला” या बटणावर क्लिक करावे.




अर्ज नोंदणी केल्यानंतर आपण दिलेल्या भ्रमणध्वनी क्रमांकावर (मोबाईल नंबर) ओटीपी प्राप्त होईल. सदर ओटीपी खालील दिसत असलेल्या स्क्रिनमध्ये टाकावा.




प्राप्त झालेला ओटीपी दिसत असलेल्या स्क्रिनमध्ये टाकल्यानंतर आपल्या भ्रमणध्वनी क्रमांकावर (मोबाईल नंबर) “युजर नेम” आणि “पासवर्ड” प्राप्त होईल.



kusum.mahaurja.com/benef_home
Beneficiary Login
MK15091337
LOGIN
Forgot Password?
Resend Username & Password?

युजर नेम व पासवर्ड टाकल्यानंतर पुढील प्रकारे स्क्रिन दिसेल.





पुर्ण अर्ज भरण्यासाठी “ Complete Your form / Go Ahed या बटणावर क्लिक करा.पुर्ण अर्ज भरण्यासाठी एकूण 8 स्टेप्स आहेत,ती सर्व माहिती भरणे आवश्यक आहे."**पहा**" या बटणावर क्लीक केल्यांनतर सर्व माहिती भरण्यासाठी पर्याय स्क्रीन वरती दिसतील.अर्जदाराने सर्व माहिती पूर्ण भरली असेल तर "**स्थिती पूर्ण**" असे दिसेल आणि माहिती पूर्ण भरली नसेल तर "**स्थिती अपूर्ण**" असे दिसेल. "**स्थिती अपूर्ण**" असल्यास "**सुधारणे** " या बटणावर क्लिक करून अपूर्ण माहिती पूर्ण करावी.


१) नवीन किंवा बदली डिझेल पंपाची विनंती:- जर लाभार्थ्याकडे डिझेल पंप असेल तर त्या पंपाची माहिती भरावी ,आणि नसेल पंप तर नाही या पर्यायावर क्लिक करावे.





२) अर्जदाराची वैयक्तिक व जमीन विषयक माहिती:- या पर्यायामध्ये अर्जदाराने वैयक्तिक (आधार कार्ड नं .,नाव ,मोबाईल इ .) व जमीन विषयक माहिती भरून “**दाखल करा**” या बटणावर क्लिक करावे.




३) अर्जदाराचा निवासी पत्ता:- या पर्यायामध्ये अर्जदाराने निवासी पत्ता ची सर्व माहिती दिल्या प्रमाणे भरून **“दाखल करा”** या बटणावर क्लिक करावे.





आपण भरलेली माहिती हि अचूक असल्याची खात्री असेल तर "**होय पुढे चला**" या बटणावर क्लिक करावे.




४) जलस्रोत व सिंचन माहिती:- या पर्यायामध्ये अर्जदाराने जलस्रोत व सिंचन या बद्दल सर्व माहिती दिल्या प्रमाणे भरून "**दाखल करा**" या बटणावर क्लिक करावे.





५) पिकांची माहिती:- या पर्यायामध्ये अर्जदाराने मागील वर्षी घेतलेल्या पिकांबद्दलची सर्व माहिती दिल्या प्रमाणे भरून "**दाखल करा**" या बटणावर क्लिक करावे.





६) आवश्यक पंपाची माहिती:- या पर्यायामध्ये अर्जदाराने आवश्यक पंपाची सर्व माहिती दिल्या प्रमाणे भरून "**दाखल करा**" या बटणावर क्लिक करावे.२.५ एकर जमिनीपर्यंत-३ एच.पी. डी.सी. पंप, २.५ एकर पेक्षा जास्त ते ५ एकर जमिनीपर्यंत-५ एच.पी. डी.सी. पंप व ५ एकर पेक्षा जास्त जमिनीकरिता-७.५ एच.पी. डी.सी. पंप मिळणे शक्य आहे.




७) बँकेची माहिती:- या पर्यायामध्ये अर्जदाराने बँकेची बद्दलची सर्व माहिती दिल्या प्रमाणे भरून "**दाखल करा**" या बटणावर क्लिक करावे.अर्जदाराने स्वत:चा बँक खाते बद्दल ची माहिती द्यावी.




८) आवश्यक कागदपत्रे अपलोड करा किंवा जोडा:- योजनेमध्ये ऑनलाईन पद्धतीने अर्ज करताना पुढीलप्रमाणे कागदपत्रांची आवश्यकता आहे :-1)७/१२ उतारा (विहीर / कुपनलिका शेतात असल्यास ७/१२ उताऱ्यावर नोंद आवश्यक) एकापेक्षा जास्त नावे असल्यास इतर भोगवाटाधारकाचे ना-हरकत प्रमाणपत्र 2)आधारकार्ड प्रत 3)रद्द केलेली धनादेश प्रत / बँक पासबुक प्रत 4)पासपोर्ट आकाराचे छायाचित्र. 5)शेतजमीन / विहीर / पाण्याचा पंप सामाईक असल्यास इतर भागिदाराचे ना-हरकत प्रतिज्ञापत्र 6)जातीचा दाखला (अनुसूचित जाती / जमाती प्रवर्गासाठी) ही कागदपत्रे कुसुम पोर्टलवर अपलोड करावयाची आहेत. "**दाखल करा**" या बटणावर क्लिक करावे.




सर्व माहिती भरून झाल्यानंतर हमीपत्र वाचून घोषणापत्र समोर दिलेल्या बॉक्स वरती क्लिक करून “अर्ज दाखल करा ” या बटणावर क्लिक करा.



अर्ज दाखल करा या बटणावर क्लिक केल्यानंतर आपण दिलेल्या भ्रमणध्वनी क्रमांकावर (मोबाईल नंबर) संदेश प्राप्त होईल. सदर संदेश प्राप्त झाल्यानंतर अर्जदाराला पात्र सौर पंपासाठी कोटेशन प्राप्त होईल. अर्जदाराने कोटेशन तपासुन पहावे. नमुना कोटेशन खालिल प्रमाणे:

**महाराष्ट्र ऊर्जा विकास अभिकरण (महाऊर्जा)**
**Maharashtra Energy Development Agency**

quotation / क्रमांक : MK1507108230

दिनांक : 22-09-2021

To,
Kacharu Umaji Vetal
DAGPIMPALGAON

विषय: महाकृषि ऊर्जा अभियान कुसुम योजने अंतर्गत कृषी पंप मागणी
आपला अर्ज दिनांक : 22-09-2021
आपला लाभार्थी क्रमांक : MK1507108230
महाऊर्जा विभागाचे नाव : MEDA SOLAR
जिल्हा : Aurangabad तालुका: Vaijapur
Virtual Account Number : 998106369634

मागणी केलेला कृषी पंप व इतर साहित्याची लाभार्थी हिस्सा रक्कम


| अ. क्र. | साहित्य | प्रकार | लाभार्थी हिस्सा रक्कम रु. |
|---|---|---|---|
| 1 | Pump | 3HP-DC | 9690 |
| एकूण रक्कम रु.: | | | 9690 |

तरी आपण उपरोक्त देय रक्कम महाऊर्जाकडे त्वरित जमा करावी. यासाठी आपण आपल्या लाभार्थी क्रमांकाचा वापर करून ऑनलाईन रक्कम जमा करू शकता. या quotation ( तपशील ) च्या दिनांकापासून ७ दिवसांच्या आत रक्कम जमा न केल्यास आपला अर्ज निकाली काढण्यात येईल.


आपण दाखल केलेल्या कागदपत्रांची प्रत्यक्ष स्थळ पाहणीचे अधीन राहून आपला अर्ज मान्य करण्यात आला आहे. प्रत्यक्ष स्थळ पाहणी केल्यानंतर निकषात न बसणारे प्रस्ताव रद्द करणेत येणार असून त्यासाठी जमा केलेली रक्कम आपण सादर केलेल्या बँक खात्यावर जमा करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

याबाबत आपल्याशी कुठलाही पत्रव्यवहार केला जाणार नाही, याची कृपया नोंद घ्यावी.

यानंतर पंपासाठी भरावी लागणारी रक्कम   “पैसे भरा” या बटणावर क्लिक केल्यानंतर दिसेल.




अर्जदार पंपासाठी दिलेल्या रकमेचा ऑनलाईन, डिडि, चलन याद्वारे भरणा करू शकतात.



kusum.mahaurja.com/beneficiary/dashboard/benf_payment/9/1337/78803

मराठी

## कोटेशन (दरपत्रक) माहिती

डॅशबोर्ड / कोटेशन (दरपत्रक) माहिती

**Maha Krushi Urja Abhiyan -PM Kusum Yojana (MK15091337)**

-अर्ज दाखल केल्याचा दिनांक : 12-09-2021

| अनु क्रमांक | माहिती | प्रकार | किंमत | जीएसटी |
|---|---|---|---|---|
| 1 | Pump | 3HP-DC | 15650 | 2817 |
| 2 | USPC | 3HP-DC | 36500 | 0 |
| | | | एकूण रक्कम रु.: | 54967 |

पैसे भरण्याची पध्दत

(•) ऑनलाईन पेमेंट ( ) डीडी ( ) चलन

लाभार्थी हिस्सा | रद्द करा

MEDA©2021All rights reserved

kusum.mahaurja.com/beneficiary/dashboard/benf_payment/9/1337/78803

मराठी

## कोटेशन (दरपत्रक) माहिती

डॅशबोर्ड / कोटेशन (दरपत्रक) माहिती

**Maha Krushi Urja Abhiyan -PM Kusum Yojana (MK15091337)**

-अर्ज दाखल केल्याचा दिनांक : 12-09-2021

| अनु क्रमांक | माहिती | प्रकार | किंमत | जीएसटी |
|---|---|---|---|---|
| 1 | Pump | 3HP-DC | 15650 | 2817 |
| 2 | USPC | 3HP-DC | 36500 | 0 |
| | | | एकूण रक्कम रु.: | 54967 |

पैसे भरण्याची पध्दत

( ) ऑनलाईन पेमेंट ( ) डीडी (•) चलन

टीपः आपणास चलनाची बँक मुद्रांक प्रत ३ ते ४ कार्यालयीन कामकाजाच्या दिवसांत मेडा डीजीएम कार्यालयात जमा करावी लागेल.

चलन डाउनलोड करा

[चलन डाउनलोड करा]

चलनाची बँक स्कॅन कॉपी*


Choose File 1337_quotation.pdf


लाभार्थी हिस्सा | रद्द करा

MEDA©2021All rights reserved

अर्जदाराने ऑनलाईन रक्कम भरल्यास “पुरवठादार नियुक्त करा” हे बटण लगेच उपलब्ध होईल. ज्या अर्जदारांनी डिडि किंवा चलनाद्वारे रक्कम भरलेली आहे त्यांना विभागीय कार्यालयाकडुन मंजुरी प्राप्त झाल्यानंतर पुरवठाधारकाची निवड करता येईल.

अर्जदाराने रक्कमेचा भरणा केल्यानंतर सौर पंप बसविण्याकरीता पुरवठाधारकाची निवड करणे आवश्यक आहे. याकरीता “पुरवठादार नियुक्त करा” या बटणावर क्लिक करा.




लाभार्थ्याने पुरवठादार निवडल्यानंतर सर्वसाधारणपणे पुढील ९० दिवसांच्या कालावधीमध्ये पंप आस्थापित होईल.